वाचले :

१.महाराष्ट्र शासन. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र: एमसीओ २०१४/प्र.क्र.२१८/नवि १४
दि.०६ जानेवारी, २०१५

२.मा.आयुक्तसो यांचेकडील मान्य प्रस्ताव दि. १६/०७/२०२४

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/४१०/२०२४
दिनांक १८/०७/२०२४

**विषय :- अतिरिक्त आयुक्त पदाचे अतिरिक्त पदभाराबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर 'अतिरिक्त आयुक्त' या अभिनामाची ३ पदे पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा 'ब' वर्ग महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला असून अतिरिक्त आयुक्तांच्या ३ पदांपैकी २ पदे राज्य शासनाच्या सेवेतील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने तर उर्वरित १ पद महानगरपालिकेच्या सेवेतील अधिका-यांमधून भरण्याची तरतुद आहे.

श्री.जगताप उल्हास, अतिरिक्त आयुक्त-३ हे दिनांक ३० जून, २०२४ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने रिक्त असलेल्या अतिरिक्त आयुक्त-३, या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे. संबंधित अधिकारी यांच्याकडे यापुर्वी सोपविण्यात आलेल्या विभागाचे कामकाज कायम राहील.

प्रस्तुत आदेशाचा अंमल तात्काळ लागू होईल.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति, संबंधित अधिकारी
प्रत-
१.लेखा विभाग
२.अतिरिक्त आयुक्त कक्ष १,२,३
३.प्रशासन टेबल क्रमांक ७,९,१०,१२,१४,संगणक कक्ष
४.लेखापरीक्षण
५.संबंधित विभाग

**(विठ्ठल जोशी)**
उपआयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका